<u>आरोपीचे प्रतिकथन</u>

<u>सक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३४८/२०२६</u>

निशाणी क्र.०५

१. गुन्हा घडल्याचा दिनांक : - ३०/०७/२०२५
२. फिर्याद दाखल करण्याचा दिनांक : - ३०/०७/२०२५
३. फिर्यादीचे नाव : - महाराष्ट्र शासन
४. आरोपीचे नाव : - आकाश उर्फ बंटी आनंद रंगारी, वय-३९ वर्ष
रा.प्लॉट नं.३६, पंचतारा सोसायटी, पो.ठाणे
बेलतरोडी, जि.नागपूर

५. <u>आरोपीस स्पष्ट केलेला गुन्हयाचा तपशील</u> : -

दिनांक ३०/०७/२०२५ रोजी १२.४५ वा. ते १३.०० वा. वाजता तुम्ही तुमच्या हा स्वत:च्या फायदयाकरीत जुगार खेळतांना पोलीसांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम रु.१२०५ सह मिळून आला व त्यामुळे तुम्ही महाराष्ट्र जुगार अधिनियमाचे कलम १२-अ प्रमाणे गुन्हा केला आहे.

MAHESH KRISHNA PATIL
Digitally signed by MAHESH KRISHNA PATIL
Date: 2026.05.09 15:25:55 +0530

दि. ०९.०५.२०२६ (एम.के.पाटील)

नागपूर. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपूर

६. <u>आरोपीचे प्रतिकथन : -</u>

प्रश्न १ :- तुम्हाला पोलिस पेपर्सच्या नकला मिळाल्या का ?
उत्तर :- होय
प्रश्न २ :- तुम्हास तुमचेवर ठेवलेला आरोप वाचून व समजावून सांगितला तो समजला काय ?
उत्तर :- होय
प्रश्न ३ :- तुम्हाला सरकारकडून वकील पाहिजे आहे का ?
उत्तर :- नाही
प्रश्न ४ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :- मला गुन्हा कबुल नाही

----------------
(आरोपीची सही/अंगठा) समक्ष

( एम. के. पाटील )

दि.०९-०५-२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर

समरी फौजदारी खटला क्र.१३४८/२०२६
निशाणी क्र.०१
सी.एन.आर.नं.एमएचएनजी-०३००२२३८२०२६

आदेश नि.०१ वर

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी- आकाश उर्फ बंटी आनंद रंगारी यांचे विरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमाचे कलम १२-अ प्रमाणे दोषारोप पत्र दाखल करण्यात आला आहे. आज रोजी आरोपी हे प्रस्तुत खटल्यात हजर झाले आहेत व त्यांचे प्रतिकथन हे नि. ०३ वर नोंदवण्यात आले व त्यामध्ये आरोपीने त्यांचे स्वइच्छेने गुन्हा कबुल केला. तसेच, आरोपी यांनी प्रस्तुत खटल्यातील गुन्हा त्यांनी केल्याचे त्यांना कबुल असलेबाबतची पुरसीस नि.०२ वर दाखल केली आहे व त्यामध्ये देखील त्यांनी प्रस्तुत खटल्यातील गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे या न्यायालयाने आरोपी यांनी त्यांचे स्वइच्छेने व कोणतेही दबावाखाली न येता गुन्हा कबुल केल्याचे खात्री केली. त्यामुळे आरोपीने केलेली गुन्हा कबुली ही स्वीकारणे योग्य आहे. त्यामुळे आरोपीसमहाराष्ट्र जुगार अधिनियमाचे कलम १२-अ प्रमाणे दोषी धरुन शिक्षा देणे आवश्यक आहे. आरोपी यांनी त्याचे आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याचे व त्यास कमीत कमी दंडावर सोडण्यात यावे अशी विनंती केली. त्यामुळे प्रस्तुत खटल्यातील गुन्हाचे स्वरुप विचारात घेता आरोपीस प्रस्तुत खटल्यातील गुन्हयासाठी न्यायालय उठे पर्यत व योग्य त्या दंडाची शिक्षा देणे आवश्यक आहे. त्यामुळे हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे-

आदेश

१. आरोपी आकाश उर्फ बंटी आनंद रंगारी यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८ (२) प्रमाणे महाराष्ट्र जुगार अधिनियमाचे कलम १२-अ चे गुन्हयासाठी दोषी धरण्यात आले व त्यास न्यायालय उठे पर्यत शिक्षा व दंड रक्कम रु.३००/- करण्यात आला व त्यांनी सदरील दंडाची रक्कम जमा न केल्यास ७ दिवस साधा कारावासाची शिक्षा भोगावी.

२. प्रस्तुत खटल्यातील जप्त रोख रक्कम रुपये १२६०/- ही शासन जमा करण्यात यावी व जप्त जुगाराचे साहित्य हे मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर त्याचा नियमानुसार नाश करण्यात यावा.

३. आरोपी याचे जामीन व बंध पत्र हे रदद करण्यात आले.

४. प्रस्तुतचा खटला निकाली काढण्यात आला.

MAHESH KRISHNA PATIL
Digitally signed by MAHESH KRISHNA PATIL
Date: 2026.05.09 15:26:00 +0530

दि. ०९.०५.२०२६
नागपूर.

(एम.के.पाटील)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपूर
पॅनल हेड (पेट्टी केसेस)